# अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ

''गुरुकुल'' अध्यापक बालकाश्रम, नेहरु पुतळ्यासमोर, लालटाकी रोड, अ.नगर.
(पब्लिक ट्रस्ट नं. ई. ३०५, अहमदनगर दि. १३/९/१९८५)

## ✻ वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ✻

## सन २०१८ - २०१९

(फक्त सभासदांसाठी)

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाची सन २०१८-१९ सालची वार्षिक सर्वसाधारण सभा विकास मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. संजय बबनराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दि. १०/९/२०१९ रोजी सकाळी १० वा. ओम गार्डन, अहमदनगर येथे आयोजित केली आहे. तरी सदर सभेस प्राथमिक शिक्षक विकास मंडळाच्या सर्व सभासदांनी हजर रहावे, ही नम्र विनंती.

### ✻ सभेपुढील विषय ✻

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) शिक्षक विकास मंडळाचा सन २०१८-२०१९ चा अहवाल व दिनांक १/४/२०१८ ते ३१/३/२०१९ अखेरचा ताळेबंद व जमाखर्च यास मंजुरी देणे.

३) सन २०१९-२०२० करिता लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व मानधन ठरवणे.

५) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

६) समारोप व आभार

टिप : गणपूर्ती (कोरम) अभावी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेण्यात येईल.

स्थळ : अहमदनगर.
दिनांक : १/०९/२०१९

विश्वस्त मंडळाचे आदेशावरुन
**श्री. कल्याणराव पोटभरे**
उपाध्यक्ष
अ. जि. प्रा. शि. मंडळाकरिता.

वार्षिक अहवाल संस्थेच्या www.vikasmandal.in
या वेबसाईटवर उपलब्ध केला आहे.

# अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ

''गुरुकुल'' अध्यापक बालकाश्रम, नेहरु पुतळ्यासमोर, लालटाकी रोड, अ.नगर.

(पब्लिक ट्रस्ट नं. ई. ३०५, अहमदनगर दि. १३/९/१९८५)

## * विश्वस्त मंडळ सन २०१६ ते २०२१ *

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजय बबनराव शिंदे | अध्यक्ष | नगर |
| २. | श्री. कल्याण महादेव पोटभरे | उपाध्यक्ष | शेवगांव |
| ३. | श्री. सर्जेराव साहेबराव घोडके | खजिनदार | राहाता |
| ४. | श्री. मोहन शंकर राशीनकर | मा. उपाध्यक्ष | नेवासा |
| ५. | श्री. अविनाश फ्रान्सिस साठे | मा. खजिनदार | श्रीरामपूर |
| ६. | श्री. राजाभाऊ पांडुरंग पालवे | विश्वस्त | नगर |
| ७. | श्री. संजय मारुती उदार | विश्वस्त | श्रीगोंदा |
| ८. | श्री. गोरक्षनाथ पांडुरंग देशमुख | विश्वस्त | अकोले |
| ९. | श्री. मच्छिंद्र भाऊराव कोल्हे | विश्वस्त | पारनेर |
| १०. | श्री. गोकुळ श्रीरंग गायकवाड | विश्वस्त | जामखेड |
| ११. | श्री. कल्याण अंकुश कोकाटे | विश्वस्त | पाथर्डी |
| १२. | श्री. पांडुरंग शंकर खराडे | विश्वस्त | कर्जत |
| १३. | श्री. लक्ष्मण बाबुराव सोनवणे | विश्वस्त | राहुरी |
| १४. | श्री. रमेश मोघुनाना दरेकर | विश्वस्त | कोपरगांव |
| १५. | श्री. भाऊसाहेब बाजीराव ढोकरे | विश्वस्त | संगमनेर |
| १६. | श्री. रमेश काळू धोंगडे | विश्वस्त | अकोले |
| १७. | श्रीमती सुनंदा गुलाब आडसुळ | महिला विश्वस्त | अ.नगर. |
| १८. | श्री. साहेबराव अनाप | पद. विश्वस्त तथा चेअरमन प्रा. शि. बँक लि. | |
| १९. | श्री. रावसाहेब र. रोहोकले | स्विकृत विश्वस्त | पारनेर |
| २०. | श्री. अरुण देशमुख | सेक्रेटरी, विकास मंडळ तथा मुख्य कार्य. अधिकारी प्रा. शि. सह. बँक, अ.नगर. | |

**एक ध्येय स्विकारा व त्याच्या ध्यासात रंगून जा !**

॥ विना संस्कार नाही सहकार ॥

# अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ

''गुरुकुल'' अध्यापक बालकाश्रम, नेहरु पुतळ्यासमोर, लालटाकी रोड, अ.नगर.

(पब्लिक ट्रस्ट नं. ई. ३०५, अहमदनगर दि. १३/९/१९८५)

# ३४ वा वार्षिक अहवाल

सन २०१८-२०१९

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाचे सर्व विश्वस्त, पदाधिकारी, मा. सभासद बंधु-भगिनी व निमंत्रित सहकारी

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाच्या सन २०१८-२०१९ सालच्या ३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस आपण सर्वजण अगत्यपूर्वक उपस्थित राहिलात याबद्दल मी आपले सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करतो.

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ हा ट्रस्ट निर्माण करताना आणि नोंदविताना ट्रस्टचे सभासद, त्यांचे कुटूंबिय आणि समाजातील उपेक्षित घटक यांच्याकरिता शैक्षणिक, सांस्कृतीक, सामाजिक उपक्रम राबविता यावेत हा विचार घेऊन अशाप्रकारचा उद्देश घटनेमध्ये समाविष्ट केला होता. त्या उद्देशाच्या पुर्ततेकरिता विकास मंडळाने सांस्कृतीक सभागृह, ग्रंथालय, वाचनालय, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र व अद्ययावत वसतीगृह बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे.

याप्रमाणे २०१८-२०१९ अहवाल सालात विश्वस्त मंडळाने सदरचा उद्देश अंमलात आणण्याकरिता प्रामाणिक प्रयत्न करुन समाजात शिक्षकांची प्रतिष्ठा वाढवण्याकरिता योगदान दिलेले आहे.

प्राथमिक शिक्षकांचे श्रद्धास्थान कै. भानुदास दादा पाटील यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करुन तसेच अहवाल सालात दिवंगत झालेले राजकीय क्षेत्रातील थोर मान्यवर, सहकार, शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते, शिक्षक बँकेचे माजी संचालक, सभासद, विकास मंडळाचे माजी सभासद, बंधु-भगिनी तसेच विविध नैसर्गिक आपत्तीत स्वर्गवासी झालेल्या बांधवांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करुन विश्वस्त मंडळाचे वतीने सन २०१७-२०१८ या वर्षातील कामकाजाचा अहवाल मी सभागृहापुढे मान्यतेसाठी सादर करीत आहे.

आपला विश्वासु

**श्री. संजय बबनराव शिंदे**

अध्यक्ष

अहमदनगर जिल्हा प्राथ. शिक्षक विकास मंडळ

॥ विना संस्कार नाही सहकार ॥

# अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ

''गुरुकुल'' अध्यापक बालकाश्रम, नेहरु पुतळ्यासमोर, लालटाकी रोड, अ.नगर.

(पब्लिक ट्रस्ट नं. ई. ३०५, अहमदनगर दि. १३/९/१९८५)

महोदय,

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा अहवाल माझे सर्व सहकारी व विश्वस्तांचे वतीने आपणासमोर सादर करीत आहे.

मुंबई सार्वजनिक न्यास कायदा कलम १९५० अन्वये आपल्या अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ या विश्वस्त संस्थेची दिनांक १-४-२०१८ ते ३१-३-२०१९ या आर्थिक हिशोब वर्षाची माहिती अहवालात दिलेली आहे. मा. पी. के. वाघ, चार्टर्ड अकौंटंट, अहमदनगर यांनी विश्वस्त मंडळाचा जमा-खर्च तपासून प्रमाणित केला आहे. अहवाल सालात विश्वस्त मंडळाच्या आवश्यकते प्रमाणे एकुण ७ सभा घेण्यात आलेल्या आहेत.

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाचे गट क्र. १५०/१ ब वर ५१.२४ आर एवढे क्षेत्र अहमदनगर शहराच्या मध्यभागी लालटाकी रोड, या हमरस्त्यावर आहे. या क्षेत्रावरील इमारत व जागेचा अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ या नावाने पब्लिक ट्रस्ट नं. ई-३०५, अहमदनगर दिनांक १३-९-१९८५ अन्वये ट्रस्ट डीड करण्यात आला. मा. धर्मदाय आयुक्तसाहेब व सहकार खाते यांच्या सर्व अटी व नियमांचे पालन करुन त्यांच्या परवानगीने या न्यासाचे सर्व व्यवहार दि. ३०-०७-१९८७ रोजी शिक्षक विकास मंडळाकडे रितसर वर्ग झाले आहेत.

## * गुरुकुल इमारत

आपल्या विश्वस्त संस्थेने उभारलेल्या गुरुकुल इमारतीसाठी सभासदांनी शिक्षक विकास मंडळावर फार मोठा विश्वास दाखवून ठेवी ठेवलेल्या आहेत. म्हणूनच अहमदनगर शहराच्या मध्यभागी गुरुकुल ही भव्य वास्तू साकारली आहे. गुरुकुल उभारणीत व ट्रस्ट डीड करण्यात ठेवीदार, सभासद बंधू-भगिनींचा सिंहाचा वाटा आहे.

या इमरातीत तळमजल्यावर ११ गाळे व मजला नं. १ वर ११ गाळे तसेच इमारतीच्या मागील बाजुस पश्चिमेस २ गाळे असे एकुण २४ गाळे आहेत.

मजला नं. २ वर अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक शाखा - नगर तालुका यांचे कार्यालय, आणि इतर ४ ऑफीसेस, मजला नं. ३ वर बँक ऑफ महाराष्ट्र क्षेत्रीय कार्यालय असे एकुण २९ भाडेकरु आहेत.

शिक्षक विकास मंडळाचे परवानगीशिवाय कोणत्याही भाडेकरुला भाडेकराराने घेतलेला गाळा दुसऱ्या भाडेकरुंना हस्तांतर करता येत नाही किंवा पोटभाड्याने देता येत नाही.

प्राथमिक शिक्षक विकास मंडळाचे गुरुकुल इमारत उभारण्याकरिता व विविध योजनेसाठी त्या काळातील सभासदांनी मोठा त्याग करुन विकास मंडळाकडे प्रत्येकी रु. १००० (अक्षरी रु. एकहजार मात्र) याप्रमाणे ठेवी ठेवलेल्या आहेत.

## प्रस्तावित संकुलास मा. सहा. धर्मदाय आयुक्तांची मंजुरी

अहमदनगर जिल्हा प्राथ. शिक्षक विकास मंडळाची जागा ही लालटाकी या गजबजलेल्या भागात आहे. या रस्त्यावर अनेक संस्थाच्या इमारती, अनेक उद्योगधंदे आहेत. नगर शहराचा वाढता विस्तार होत असताना ही जागा मध्यवर्ती ठिकाणी आहे. शहरातील नागरिकांच्या गरजा पुर्ण करणारे भव्य व्यावसायिक तसेच सामाजिक उपक्रमांना वाव देणारे शिक्षक संकुल उभे करण्याचा विश्वस्त मंडळाचा मानस आहे. नियोजित संकुल विकास मंडळाच्या घटनेनुसार सभासद बंधु-भगिनींच्या विकासात मोलाची भर घालणार आहे. त्यामुळे विकास मंडळाचे उत्पन्न वाढणार आहे. त्याचा उपयोग विकास मंडळाच्या योजना राबविण्यासाठी होणार आहे.

दि. २८/८/२०१६ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार मा. सहा. धर्मदाय आयुक्त पुणे यांचेकडे रितसर ३६ (अ) ३ चा प्रस्ताव दि. २१/२/२०१७ रोजी ३/२०१७ अन्वये दाखल केला होता. सदर प्रस्तावावर दि. २१/६/२०१७ रोजी मा. सहा. धर्मदाय आयुक्त साहेब पुणे विभाग यांनी विकास मंडळाच्या नियोजित वास्तुकरिता निधी उभारणे तसेच नियोजित संकुल बांधकाम करण्यास परवानगी दिलेली आहे. तशा प्रकारचा आदेश संस्थेस प्राप्त झालेला आहे. ही विकास मंडळाच्या दृष्टिने अत्यंत आनंदाची बाब आहे. या कामी भविष्यात सर्व सभासदांचे सहकार्य अपेक्षित आहे.

## प्रस्तावित संकुलास महानगरपालिकेची मंजूरी

विकास मंडळाचा प्रस्तावित संकुलाचा आराखडा अर्ज क्र. ८११७१२०२०००५६ अन्वये दि. २/१२/२०१७ रोजी महापालिकेत मंजूरी करिता दाखल केला. त्याप्रमाणे छाननी फी व अग्निशामक फी चा महापालिकेत रितसर भरणा केला. त्यानुसार मंजुरी नकाशाच्या रेखांकनाची छाननी होऊन म. प्रा. व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ ख (सुधारणा) अधिनियम २०१० अन्वये सुधारित अधि. १९९६ प्रमाणे एल.ओ.आय.क्र. ४०६ नुसार जा.क्र. ३११२ अन्वये दि. ५/६/२०१८ रोजी स्विकृती पत्र प्राप्त झाले.

सदर स्विकृती पत्रान्वये इमारत बांधकाम उपकर, विकास शुल्क, सुरक्षा अनामतीचा रितसर भरणा महापालिकेत होऊन प्रस्तावित आराखड्यास बांधकाम परवाना क्र. बी.पी.ए./००७८८/२०१८-१९ दि. १२/७/२०१८ अन्वये अंतिम मंजूरी मिळालेली आहे.

## ❊ नियोजित प्राथमिक शिक्षक संकुल एक दृष्टिक्षेप

- ❊ अहमदनगर शहरातील अतिशय भव्य व सुसज्ज असे नाट्यसंकुल अंदाजे ७५० आसनांचे असणार आहे.
- ❊ दर्शनी बाजुस तळमजल्यावर ४ व ग्राऊंड फ्लोअरवर ४ असे एकुण आठ शोरुम प्रत्येकी अंदाजे ४५० चौ. फुटांचे
- ❊ पाठीमागील बाजुस एकुण १२ ऑफिसेस प्रत्येकी अंदाजे ३५० ते ४०० चौ. फुटांचे

* पुर्व-पश्चिम पहिला मजला व दुसरा मजला नाट्यगृह तसेच प्रशस्त फुडपार्क, गॅलरी व कॉरिडॉरसह.
* उत्तर बाजुला उपहार गृह (रेस्टॉरंट) ची सुविधा उपलब्ध.
* गुरुकुल इमारतीमागे उत्तर दक्षिण पहिल्या मजल्यावर प्रशस्त हॉल अंदाजे ५००० चौ.फु. (बँक अथवा क्लासेस करीता)
* दुसरा मजला स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, वाचनालय, अभ्यासिका, भोजन गृह, ग्रंथालयासह अद्यावत निवासव्यवस्था
* स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्रात प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना प्राधान्य.
* नियोजित शिक्षक संकुल तळमजला वगळुन ४०७०.४१ चौ.मी. क्षेत्रफळाचे असेल.
* विजेच्या बाबतीत स्वयंपुर्ण होण्याकरिता टेरेसवर सोलर वॉटर तसेच सोलर पॅनल बसवण्याचा मानस.
* अहमदनगर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या वैभवशाली वास्तुचा आराखडा व डिझाईन वास्तु विशारद श्री. विष्णु कुंजार ॲण्ड असोसिएटस् औरंगाबाद यांचा आहे.

## * भविष्यातील योजना

१) अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाच्या माध्यमातुन दुर्धर आजारग्रस्त प्राथमिक शिक्षक सभासदांना भरीव आर्थीक मदत करणे.

२) मयत सभासदांना आर्थिक मदत करणे.

३) समाजातील उपेक्षीत घटकांमधील गुणवंत विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी मदत करणे.

## * विकास मंडळाच्या सभासदांना आवाहन

* नियोजीत भव्य वास्तु जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांचे भुषण व गौरवशाली परंपरा जोपासणारी असणार आहे. अभ्यासिका, ग्रंथालय, वाचनालय, प्रत्येक निवासखोली यावर विकास मंडळ देणगीदारांच्या नातेवाईकांच्या नावाने स्मृती जपण्याचा प्रयत्न करणार आहोत.

म्हणून सभासदांनी सढळ हाताने मदत करून आम्हाला या कार्यासाठी प्रेरणा द्यावी.

* नियोजित वास्तु शिक्षकांच्या पैशातुन उभी करावी अशी मागणी दि. २८/८/२०१६ शिक्षक बँकेच्या सर्वसाधारण सभेत सर्वच शिक्षक संघटनांच्या प्रतिनिधींनी केलेली होती. त्याप्रमाणे मा. धर्मदाय आयुक्तांच्या परवानगीने विकास मंडळाच्या सभासदांकडून स्वेच्छेने रु. १००००/- ठेव वर्गणी घेण्याचा संस्थेचा मनोदय आहे. अशा प्रकारची ठेव विकास मंडळाकडे परतफेड या अटीस अधिन राहुन असणार आहे. उपरोक्त ठेवीवर विकास मंडळाकडून प्रतिवर्षी बँकेप्रमाणे व्याज देय असणार आहे. ठेवीवर व्याज देण्याबाबत मा. धर्मदाय आयुक्तांच्या आदेशात स्पष्टपणे नमुद करण्यात आलेले आहे.

## * विकास मंडळाच्या ठळक बाबींवर दृष्टीक्षेप

विकास मंडळाचे उत्पन्न करमुक्त करण्यासाठी १२ अअ (३) चा प्रस्ताव नाशिक व पुणे विभागीय कार्यालयात सादर केला होता. त्यानुसार पुणे विभागीय आयकर आयुक्तांनी दि. २७ जून २०१८ रोजी नं. PN/CIT(Exemp)/Tech/12AA/A'bad Rg./844/204/2017-18/1578 अन्वये संस्थेला प्रमाणपत्र प्रदान केले आहे. उपरोक्त बाब संस्थेच्या आर्थिक हिताकरिता अत्यंत महत्वाची आहे.

※ विकास मंडळ नियोजीत संकुलास ३६ अ (३) अन्वये मा. सहा. धर्मदाय आयुक्त पुणे विभाग यांची मंजुरी मिळवण्याकामी यशस्वी पाठपुरावा व सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करण्यात यश.
※ विकास मंडळाचे सर्व आर्थिक व्यवहार रोखीने किंवा हातावर करण्यास पुर्णपणे निर्बंध.
※ कॅशलेस व्यवहारांना चालना, फक्त चेकनेच व्यवहार.
※ इमारत ठेवीदारांच्या ठेवी त्यांच्या खाती चेकनेच जमा करण्याच्या ठरावावर अंमलबजावणी केली आहे.
※ विकास मंडळाची अकृषक थकबाकी महसुल कर एक रकमी भरणा करण्यात आला.
※ महापालिका कराचा एप्रिलपुर्वीच संपूर्ण भरणा
※ गाळ्यांचे भाडे बेसमेंट व पहिला तसेच दुसरा मजला प्रति स्क्वे. फुट १५ रु. दराने व ग्राऊंड फ्लोअर २० रु. प्रति स्क्वे. फुट दराने करण्याचा ठराव. गाळ्यांच्या भाड्यात ५०० ते १२०० वरुन थेट ३००० ते ४००० रु. पर्यंत वाढ करण्यात यश.
※ विविध सामाजिक संस्थाना उपयोगी साहीत्य व धान्यवाटप उपक्रम राबवला तसेच जिल्ह्यातील दुर्गम, डोंगराळ भागातील जिल्हा परिषद तसेच प्राथ. शाळांमधील मुलींना शुज सॉक्स व शालेय साहित्य वितरण.
※ आपत्तीग्रस्त शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची मदत.
※ अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेच्या सर्वच सभासदांना घटना नियम ६ अन्वये विकास मंडळाचे सभासद करुन घेण्यात यश तसेच सभासद यादी अद्ययावत.
※ विकास मंडळ संगणकीकृत करण्यात यश.
※ गाळेधारकांचे करार फक्त ३५ महिन्यांचे करण्यास बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये बंधनकारक.
※ अनावश्यक खर्चास संपुर्णपणे आळा घातला.
※ अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाची निती आयोगाकडे नोंदणी झाल्यामुळे (एम.एच./२०१९/०२३९५६१) हा युनिक आय.डी. संस्थेला प्राप्त झाला.
※ अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाची www.vikasmandal.in ही अधिकृत वेबसाईट सुरु झाली आहे.
※ ट्रस्टचे आय.टी.आर. रिर्टन आयकर खात्याकडे परिपूर्णपणे भरलेले आहेत.

## ※ विकास मंडळाच्या ऐतिहासीक पर्वाचा शुभारंभ

अहमदनगर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या स्वप्नातील वास्तुचा भुमिपुजन शुभारंभ दि. ३०/१२/२०१८ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मा. खासदार श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या शुभहस्ते व पालकमंत्री मा. ना. राम शिंदे, विधानसभेचे विरोधीपक्षनेते मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील, विधानसभेचे उपाध्यक्ष मा. ना. विजय औटी, अखिल भारतीय काँग्रेस कमेटी सदस्य मा. आ. बाळासाहेब थोरात, मा. मंत्री आ. दिलीप वळसे पा., आ. भाऊसाहेब कांबळे, आ. सुधीर तांबे, जि.प. अध्यक्षा शालीनीताई विखे, उपाध्यक्षा राजश्री घुले, शिक्षक नेते संभाजीराव थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी विकास मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री. चं. भि. धनवटे गुरुजी यांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आपणा सर्वांच्या समर्थ पाठबळावर शिक्षकांना सन्मान प्राप्त करुन देणारे शिक्षक संकुल येत्या दोन वर्षात उभे राहील याची सभासदांच्या आशिर्वादाने खात्री व विश्वास आहे.

## अभिनंदन !

अहवाल सालात ज्या सभासद बंधू भगिनींनी अध्ययन व अध्यापनाचे कार्य गतीमानतेने करुन आपली शैक्षणिक पात्रता वाढविली, विविध शालेय प्रकल्प व उपक्रम, शास्त्रीय प्रदर्शने राबवून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी अथक प्रयत्न केले. विविध क्षेत्रात नेत्रदीपक कार्य करुन पारितोषिके व प्रशस्तीपत्रके मिळवीली. जिल्ह्यामधील टेक्नोसेव्ही शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर करत शिक्षण क्षेत्रात डिजीटल क्रांती घडवून आणली तसेच अहवाल सालात ज्या सभासदांनी स्पर्धा परिक्षेत यश संपादन केले ज्यांना मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकार पदावर पदोन्नती मिळाली तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या शासनाच्या प्रकल्पात अहमदनगर जिल्ह्याने राज्यात अव्वल स्थान प्राप्त केले आहे. तालुका, जिल्हा राज्य व राष्ट्रीय पातळीवर आदर्श शिक्षक पुरस्कार व इतर सन्माननीय पुरस्कार प्राप्त केले अशा सर्व सभासदांचे तसेच सर्व नगरपालिका व भिंगार कॅन्टो. प्राथमिक शाळेतील आदर्श शिक्षक पुरस्कृत सभासदांचे मनःपूर्वक अभिनंदन.

तसेच आमचे विश्वस्त मंडळातील विश्वस्त, सदस्य इ. चे पाल्यांनी पूर्व माध्यमिक/माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेत मिळविलेल्या विशेष यशाबद्दल त्यांचे अभिनंदन ! त्याबरोबरच शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेल्या जिल्ह्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांचे अभिनंदन.

## आभार

राज्य प्राथ. शिक्षक संघाचे संपर्क नेते तथा अ.जि.प्रा. शिक्षक बँकेचे माजी चेअरमन मा. रावसाहेब रोहोकले, माजी व्हा. चेअरमन मा. सीमा निकम, संघाचे नाशिक विभागीय अध्यक्ष मा. आबासाहेब जगताप, केंद्रप्रमुख संघटनेचे राज्य सरचिटणीस मा. निळकंठ घायतडक, जिल्हा संघाचे अध्यक्ष मा. संजय शेळके, गुरुमाऊली मंडळाचे अध्यक्ष मा. संतोष तांबे, उच्चाधिकार समिती प्रमुख मा. रावसाहेब सुंबे, महिला आघाडी अध्यक्षा मा. विद्या आढाव, राज्यसंघाचे मा. रा. वि. शिंदे, मा. बाळासाहेब सहाणे, मा. आर पी. रहाणे, मा. कैलास चिंधे, मा. दत्ता कुलट, मा. श्रीकृष्ण खेडकर, जेष्ठ मार्गदर्शक मा. सु. पा. वांढेकर, मा. नवनाथ भापकर केंद्रप्रमुख संघटनेचे अध्यक्ष आर. के. ढेपले, मा. मोहनराव पागिरे, मा. सलीमखान पठाण, मा. अरुण आवारी, नगरपालिका संघाचे मार्गदर्शक मा. अल्ताफ शहा, न. पा. जिल्हाध्यक्ष मा. मच्छिंद्र लोखंडे, उत्तर जिल्हाप्रमुख मा. राजकुमार साळवे, दक्षिण जिल्हाप्रमुख मा. संतोष दुसुंगे, मा. विठ्ठल फुंदे, मा. विकास डावखरे, मा. बाळासाहेब सरोदे, मा. बाळासाहेब तापकिर, मा. विलास गवळी, मा. राम निकम, मा. सत्यवान मेहेर, रामेश्वर चोपडे, संजय म्हस्के, दत्ता गमे, दिलीप महाले, अशोक ढगे, बबन भालेराव, शिक्षक संघ व गुरुमाऊली मंडळाचे सर्व जिल्हा व तालुका पदाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, पदवीधर संघटनांचे पदाधिकारी, मा. सहा. धर्मदाय आयुक्त साहेब व कर्मचारी, संस्थेचे कायदेशीर चॅरिटी सल्लागार ॲड. जयदीप देशपांडे, शिक्षक बँकेचे सर्व संचालक कायदेशीर सल्लागार ॲड. अनुराधा येवले, लेखापरिक्षक मे. पी.के. वाघ ॲण्ड कंपनी, विकास मंडळाचे सर्व सभासद बंधू भगिनी, व्यवस्थापक सुरेंद्र आढाव व कर्मचारी या सर्वांचे जाहिर आभार व कृतज्ञता संस्थेचे सर्व उपक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेस तन, मन, धनपूर्वक सहकार्य करावे. मौलीक सूचना व कार्याविषयी मार्गदर्शन करावे ही विनंती.

मा. विश्वस्त मंडळाचे वतीने ३३ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आपल्या मंजुरीसाठी सादर करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावे ही नम्र विनंती.

सर्वांचे पुनश्च मनःपुर्वक आभार..!

ठिकाण : अहमदनगर.
दिनांक : १/९/२०१९

आपला विश्वासु
**श्री. संजय बबनराव शिंदे**
अध्यक्ष
अहमदनगर जिल्हा प्राथ. शिक्षक विकास मंडळ

# स्थानिक लेखा परीक्षकाचा अहवाल

मी अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ, अहमदनगर या संस्थेचा सोबत जोडलेला दि. ३१/३/२०१९ या दिनांकाचा ताळेबंद व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या वर्षाचे नफा तोटा पत्रकाचे लेखापरिक्षण केले असून अहवाल करतो की,

१) माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत.

२) माझ्या मते पुस्तकाच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९३२ नुसार त्याखालील नियम संस्थेचे पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) मी तपासलेल्या ताळेबंद व नफा तोटा पत्रक संस्थेच्या पुस्तकांशी व विवरणाशी जुळत आहे.

४) माझ्या मते आणि माझे माहितीप्रमाणे तसेच मला देण्यात आलेल्या खुलाशावरुन हे हिशोब बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९३२ नुसार त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात.

अ) ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/३/२०१९ ची सांपत्तीक स्थिती

ब) उत्पन्न व खर्च पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या अगर मुदतीच्या संस्थेच्या वाजवी तुटीची सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

स्थळ : अहमदनगर.

दिनांक : १/०९/२०१९

पी. के. वाघ ॲण्ड कंपनी
सनदी लेखापाल
अहमदनगर.

# अहमदनगर जिल्हा प्राथमिक

## ताळेबंद पत्रक

| ३१/३/२०१८ | भांडवल व देयता | | ३१/३/२०१९ |
|---|---|---|---|
| ५,००,०००.०० | भागभांडवल | | ५,००,०००.०० |
| | घसारा निधी | | |
| | मागील | २१,६२,७६४.०० | |
| | अधिक चालू | १,४५,२८८.०० | २३,९८,९४४.०० |
| २१,६२,७६४.०० | इमारत नं. २ | ०.०० | |
| २०,३५,४५०.०० | सभासद वर्गणी | २०,३५,४५०.०० | |
| | चालू वर्गणी | ४३,८००.०० | २०,७९,२५०.०० |
| | सभासद ठेवी | | |
| ६,५५,२६०.०० | मागील | ६,५५,२६०.०० | |
| | परतफेड | १३,०००.०० | ६,४२,२६०.०० |
| २२,८६,४६२.०० | गाळे डिपॉझीट | | २२,८६,४६२.०० |
| १,५००.०० | मिटर डिपॉझीट | | १,५००.०० |
| १७,०००.०० | निवडणुक डिपॉझीट | | ०.०० |
| ९८,१६५.०० | म्युसि. कर व इतर देणे | | ११,७०४.०० |
| ३५,१२६.०० | सभासद मुदत ठे.व्या. तरतुद | | ३५,१२६.०० |
| | नविन इमारत डिपॉझिट | | ३७,४५,०००.०० |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| ७७,९१,७२७.०० | एकूण | | १,१७,००,२४६.०० |

# शिक्षक विकास मंडळ, अहमदनगर.
## दि. ३१ मार्च, २०१९ रोजीचे

| ३१/३/२०१८ | मालमत्ता व येणी | | ३१/३/२०१९ |
|---|---|---|---|
| ३६,२३,९६३.00 | स्थिर मालमत्ता | | |
| | इमारत क्र. १ | 0.00 | |
| | इमारत क्र. २ | ३२,३२,९९७.00 | |
| | वॉल कंम्पाऊंड | २,४८,३२९.00 | |
| | डेडस्टॉक | ९२,६४0.00 | |
| | फिक्सर्स ॲण्ड फिटींग | २२,४७0.00 | |
| | कॉम्प्युटर व प्रिंटर | २५,५२७.00 | ३६,२३,९६३.00 |
| १0,00,000.00 | एफ.डी. सेव्हींग | | १0,00,000.00 |
| | व्याज | | ८९,८९२.00 |
| ८६,१३0.00 | डिपॉझीट | | |
| | टेलिफोन | ४,३00.00 | |
| | इलेक्ट्रिक मिटर नं. १ | ७५0.00 | |
| | इलेक्ट्रिक मिटर नं. २ | ८६,१३0.00 | ९१,१८0.00 |
| ८६,४६१.00 | आयकर येणे | | ३१,४२९.00 |
| ४,८६,८७७.00 | कॅश व बँक | | |
| | रोख शिल्लक | 0.00 | |
| | खाते नं. १ | १,८९,१७१.00 | |
| | खाते नं. २ | ७६,0६५.00 | २,६५,२३६.00 |
| | नविन इमार म्यु. टॅक्स | ४१,१७,७१२.00 | |
| २५,0८,२८६.00 | उत्पन्न व खर्च खाते | | |
| | मागील तोटा | २५,0३,२३६.00 | |
| | वजा चालू नफा | २२,४0२.00 | २४,८0,८३४.00 |
| ७७,९१,७२७.00 | एकूण | | १,१७,00,२४६.00 |

# अहमदनगर जिल्हा प्राथमिक


## नफा - तोटा पत्रक

| ३१/३/२०१८ | खर्च | ३१/३/२०१९ |
|---|---|---|
| १,५५,000.00 | सेवक वेतन बोनस | १,७१,000.00 |
| ६६,६00.00 | विश्वस्त मंडळ मिटींग भत्ता | ७८,000.00 |
| 0.00 | चहापान व भोजन | 0.00 |
| २१,0२0.00 | लाईट बील व इले. रिपेअर्स | २९,१४0.00 |
| १,५६,६८0.00 | म्युनि. टॅक्स | ४६,३७0.00 |
| २८,८४५.00 | रिपेअर मेंटेनन्स | १0,३0१.00 |
| ७३३१.00 | प्रिंटींग, स्टेशनरी | ५,४४0.00 |
| ५३९७.00 | नोटीस फी व टेंडर फॉर्म | २६,0१७.00 |
| 0.00 | बँक कमिशन | ३४.00 |
| २२,000.00 | ऑडीट फी व इतर रजिस्ट्रेशन | १२,000.00 |
| १0,३१९.00 | किरकोळ खर्च | ६,३१५.00 |
| 0.00 | सभासद डिपॉझीट व्याज | २,१७,५८९.00 |
| १,२८,000.00 | आर्कीटेक्ट फि (प्लॅन व नकाशा) | ५९,000.00 |
| ५६,000.00 | वकील फी व १२ अे | १,१३,000.00 |
| ४१,९७१.00 | वार्षिक सभा | ४७,0९0.00 |
| ५000.00 | दिंडी भोजन | ५000.00 |
| २८,६९४.00 | धर्मदाय उपक्रम | २0,२00.00 |
| २९६५.00 | रंगकाम | 0.00 |
| १,२३,३१७.00 | घसारा इमारत क्र. २ | १,0८,९४४.00 |
| १३,७४३.00 | डेडस्टॉक | ३६,३४४.00 |
| 0.00 | भुमिपुजन | ३,00,000.00 |
| २८४0.00 | सफाई चार्जेस | 0.00 |
| ८६,८३८.00 | वाढावा | २२,४0२.00 |
| 0.00 | विश्वस्त प्रवास भत्ता | 0.00 |
| २,000.00 | जी.एस.टी. रजिस्ट्रेशन | |
| ९,६४,५६0.00 | एकूण | १३,१४,१८६.00 |


## अहमदनगर जिल्हा प्राथमिक

### दि. १/४/२०१८ ते ३१/३/२०१९ अखेर

| ३१/३/२०१८ | उत्पन्न | ३१/३/२०१९ |
|---|---|---|
| ८,४६,५७८.00 | इमारत भाडे | ११,३५,३१३.00 |
| ४४,३८२.00 | बँक व्याज | ६,७७३.00 |
| १३,६00.00 | देणगी | ३,000.00 |
| ६0,000.00 | स्क्रॅप विक्री | 0.00 |
| | टेंडर फॉर्म फी | १,३५,000.00 |
| | जाहीरात भाडे | ३४,१00.00 |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| ९,६४,५६0.00 | एकूण | १३,१४,१८६.00 |




FRONT ELEVATION






SECTION AT A- A


PARKING FLOOR




BASEMENT FLOOR PLAN


COMMERCIAL FLOOR
63.75
20.64
44.64
40.36
31.060
5.060
4.02 M WIDE DRIVE WAY
RAMP UP FROM PARKING
WAY TO GARDEN RESTAURANT
GROUND FLOOR PLAN
RAMP DN TO PARKING
CENTRAL PODIA
EXISTING FIRST FLOOR PLAN


BANK & THEATRE FLOOR
63.75
20.64
44.64
31.060
5.060
BANK OFFICE
7.77 X 7.86
BANK HALL
23.77 X 21.18
ENTRANCE FOYER
FOR THEATRE
18.41 X 12.91
FIRST FLOOR PLAN
LOUNGE
8.12 X 6.50
PERFORMING THEATRE
18.41 X 12.91
ROOM
6.66 X 5.04
STAGE
18.41 X 6.00
EXISTING FIRST FLOOR PLAN


HALLS & THEATRE FLOOR
63.75
20.64
44.64
COMPETETIVE EXAM LECTURE HALL 7.77 X 8.66
COMPETETIVE EXAM LECTURE HALL 7.77 X 8.66
COMPETETIVE EXAM LECTURE HALL 7.77 X 8.66
FLOOR LOBBY
FLOOR LOBBY
SECOND FLOOR PLAN
PERFORMING THEATRE 18.41 X 44.18
STAGE 18.41 X 6.00
31.060
5.060
EXISTING FIRST FLOOR PLAN


AGFA
Firestone
AVON
SPRING
SUAREZ
OPEN